# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 23/02/2025** **वार – रविवार**

---

**संमेलन**

दिल्लीत आयोजित 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज समारोप होत आहे. या सोहळ्याला संमेलनाध्यक्ष डॉक्टर तारा भावळकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि पुण्यातील सरहद संस्थेनं आयोजित केलेल्या या संमेलनात तीन दिवस विविध विषयावरचे परिसंवाद, चर्चासत्र, कविसंमेलन आदि कार्यक्रम झाले.

**युनेस्को**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठीच्या प्रस्तावाच्या सादरीकरणासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारचं चार सदस्याचं शिष्टमंडळ आज पॅरिसला रवाना झालं. या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ल्याचा समावेश आहे.

**पवनाथडी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं भरवलेल्या पवनाथडी जत्रेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यंदा या जत्रेत ७५०हुन अधिक दालनांमधून महिला बचत गटांच्या वस्तू, खाद्यपदार्थ

विक्रीसाठी उपलब्ध आहेत. महाराष्ट्राच्या परंपरेचं दर्शन घडवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. उद्या या यात्रेचा समारोप होणार आहे.

**संतगाडगेबाबा**

प्रभावी कीर्तनाच्या माध्यमातून समाजाला जागृत करण्याचं कार्य करणारे आणि स्वच्छतेचं महत्त्व पटवून देणारे थोर संत आणि समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती आज सर्वत्र साजरी होत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी आणि प्रभारी कुलसचिव डॉ ज्योती भाकरे यांनी गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

**उत्कर्ष**

विद्यार्थ्यांच्या परीपूर्ण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबवले जाणारे सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम महत्त्वाचे ठरतात असं मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी यांनी आज व्यक्त केलं. राज्याचा उच्च तंत्रशिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं आयोजित केलेल्या १५व्या 'उत्कर्ष' स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. उत्कर्षसारख्या स्पर्धेच्या विविध कलाप्रकारांमधून दिले जाणारे सामाजिक संदेश महत्त्वाचे असल्याचं गोसावी यावेळी म्हणाले.

**सुपोषितग्रामपंचायतअभियान-**

केंद्र सरकारने घोषित केलेल्या 'सुपोषित ग्रामपंचायत' अभियान स्पर्धेत बालकांचा पोषण आहार आणि अंगणवाडीतील वैविध्यपूर्ण गोष्टींसाठी देशातील एक हजार ग्रामपंचायतींना प्रत्येकी एक लाख रुपये दिले जाणार आहेत. या अभियानात राज्यातील २ हजार ७५० ग्रामपंचायती सहभागी झाल्या आहेत. राज्याने ग्रामपंचायतींची निवड करताना काही निकष ठरवून दिले होते. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील १६३ ग्रामपंचायतींची निवड झाली आहे. त्यातील किमान ७५ ग्रामपंचायतींना एक लाख रुपयांचं बक्षिस

मिळवण्याचं उद्दिष्ट जिल्हा परिषदेने ठेवलं आहे. निवड झालेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांची बैठक जिल्हा परिदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे, अशी माहिती पुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जामसिंग गिरासे यांनी दिली.

**<u>आरोग्यमित्र</u>**

महाराष्ट्र आरोग्यमित्र कर्मचारी संघटनेने १८ फेब्रुवारीपासून कायदेशीर नोटीस देऊन आरोग्यमित्रांच्या मागण्यांसाठी संप सुरू केला होता. आरोग्य मित्रांच्या शिष्टमंडळाने भेट घेतल्यानंतर राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांनी विधानसभा अधिवेशन काळात बैठक लावून मार्ग काढण्याचं आश्वासन दिलं; तसंच राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही लक्ष घालण्याचं आश्वासन दिल्यानंतर महाराष्ट्र आरोग्यमित्र संघटनेने संप स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

**<u>स्वामीगोविंददेवगिरी</u>**

संतांच्या साहित्यामध्ये वेदांचं सार असून ते जगाच्या कल्याणासाठी प्रेरक आहे असं प्रतिपादन श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरि यांनी केलं आहे. पुण्यातील मोशी इथल्या वेदश्री तपोवन इथे स्वामी गोविंद देव गिरि यांच्या अमृत महोत्सवानिमित्त दासबोध सखोल अभ्यास फौंडेशननं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अयोध्येतील वेदपाठ शाळेसाठी निधी अर्पण करण्यात आला. समर्थ रामदार स्वामींचा दासबोध जनमानसात सर्व दूर पोहोचवण्यासाठी डिजीटल तंत्रज्ञानाचं सहाय्य घेऊन दासबोध सखोल अभ्यास मंडळाने अपार परिश्रम घेतल्याचं स्वामी गोविंद देव गिरि यावेळी म्हणाले.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. फ्लॉवर, कोबी, मटार सिमला मिरची, तसंच तोतापुरी कैरीच्या भावात घट

झाली. पालेभाज्यांमध्ये शेपू, कांदापात, चवळाई, मेथी यांचे भाव खाली आले आहेत. उन्हाचा चटका वाढल्याने कलिंगड आणि खरबुजाची मोठी आवक झाली असून भाव घसरले आहेत. फुलबाजारात मोठी रेलचेल असून शोभिवंत फुलांचे भाव वधारले आहेत.

**स्नूकर**

पुण्यात सुरू असलेल्या स्नूकर मानांकन स्पर्धेत आरव संचेती, साद सय्यद, अभिजीत रानाडे आणि मुर्तझा अझदार या खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून स्पर्धेच्या उप-उपांत्यपुर्व फेरीमध्ये प्रवेश केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल 36 तर किमान 15 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**